SALES HIT RECORD 26.3 MMT; CAPACITY UTILISATION AT 107%

IOC Net Doubles on Higher Margins

LPG losses narrow, revenue from ops rises marginally in the April-June quarter

Our Bureau

New Delhi: Indian Oil reported doubling of net profit to ₹5,689 crore in the June quarter from ₹2,643 crore a year earlier buoyed by robust marketing margins.

Revenue from operations grew 1% to ₹218,608 crore in the three months ended June. "Improvement in net profit is mainly on account of higher refining and marketing margins being set off to some extent by inventory losses," the state-run refiner and retailer said.

Indian Oil incurred an inventory loss of ₹6,465 crore during the quarter compared to an inventory gain of ₹3,345 crore a year earlier, said AS Sahney, chairman, referring to the strong impact of inventory in the quarterly earnings.

The company's gross refining margin (GRM) for the quarter was $2.15 per barrel compared to $6.39 per barrel in the year-ago period. After removing the effect of inventory loss and gain, margin stood at $6.91 compared to $2.84 a year earlier.

Indian Oil and other domestic fuel retailers like Bharat Petroleum (BPCL) and Hindustan Petroleum (HPCL) have been enjoying strong margins on retail sales of petrol and diesel since they have continued to keep pump prices frozen despite a decline in international fuel rates.

Indian Oil had an under-recovery of ₹5,858 crore on the sale of cooking gas during the quarter compared to ₹4,291 crore a year earlier. The government has decided to compensate oil marketing companies to the tune of ₹30,000 crore for LPG under-recoveries, but the modalities are yet to be worked out.

Indian Oil reported the highest-ever quarterly sales volume of 26.32 million metric tonnes (MMT) in April-June compared to 25.25 MMT in the year-ago period. The company's domestic petroleum sales volume rose 4.2% against the industry's 3.9%. Institutional diesel sales volume increased 40.3% compared to industry's 14.8%. Average capacity utilisation at its refineries was 107% during the quarter.

Shares in Indian Oil, valued at about ₹198,000 crore, ended 1.58% lower at ₹140.15 apiece on Thursday when the benchmark BSE Sensex closed nearly unchanged.

Co Continues to Buy Russian Oil, says Chief

Our Bureau

New Delhi: Indian Oil, the country's largest refiner, is continuing to buy crude oil from Russia since it has not been given any instruction by the government against doing so, said A S Sahney, chairman, on Thursday.

US President Donald Trump has imposed a 25% penalty on India for importing Russian oil, in addition to the previous 25% tariff. The penalty is scheduled to take effect on August 27. Trump is meeting Russian President Vladimir Putin in Alaska on Friday to explore a peace deal on Ukraine.

US Treasury Secretary Scott Bessent warned in a TV interview on Wednesday that Washington could raise secondary tariffs on India if the Trump-Putin talks do not go well.

"Neither we are being told to buy nor told not to buy (Russian oil)," Sahney said of the Indian government's stance on the issue. "We are not making extra effort for either increasing or decreasing the share of Russian crude," he added.

Russian oil accounted for about 22% of the crude processed by Indian Oil in the June quarter.

"More or less the share will remain the same (in the near future)," Sahney said, adding that economics was driving the crude sourcing decision. However, if a penalty is imposed, "then it goes beyond the scope" of the company, he said.

He pointed out that there was no sanction on Russian crude. "There is only a price cap," Sahney said, adding Indian Oil was abiding by it.

Russian oil is currently being sold at a discount of around $1.5 per barrel to the benchmark Brent, a BPCL executive said.

'देशरक्षणासाठी सशस्त्र दले सज्ज'

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींचा संदेश

'दहशतवादाविरुद्ध मानवतेच्या लढाईत ऑपरेशन सिंदूर हे सशस्त्र कारवाई इतिहासात एक सर्वोत्तम उदाहरण म्हणून नोंदले जाईल. पहलगाम हल्ल्याला भारताने दिलेला हा निर्णायक आणि ठाम प्रतिसाद होता व त्यामुळे हे सिद्ध झाले की आपली सशस्त्र दले राष्ट्राचे रक्षण करण्यासाठी कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यास तयार आहेत,' अशा शब्दांत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी आपल्या जवानांच्या शौर्याचा गौरवोल्लेख केला.

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला दिलेल्या संदेशात राष्ट्रपतींनी भारताच्या धोरणात्मक यशाचा, आर्थिक विकास, राष्ट्रीय शिक्षण धोरण, राष्ट्रीय क्रीडा धोरण, कल्याणकारी योजनांचे फायदे, डिजिटल पेमेंटचे यश आणि कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रात सरकार करत असलेले प्रयत्न आदींचा उल्लेख केला.

'या संपूर्ण कालावधीत आपली एकता ही आमच्या प्रतिसादाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य होती. ही एकता आम्हाला विभाजित पाहू इच्छिणाऱ्या सर्व घटकांना सर्वात योग्य उत्तर आहे,' असे राष्ट्रपतींनी अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की भारताचा दृष्टिकोन स्पष्ट करण्यासाठी विविध देशांमध्ये गेलेल्या संसद सदस्यांच्या बहुपक्षीय शिष्टमंडळांमध्येही एकता दिसून आली. जागतिक समुदायाने भारताच्या धोरणाची दखल घेतली आहे की भारत आक्रमक होणार नाही, परंतु आपल्या नागरिकांचे रक्षण करण्यासाठी प्रत्युत्तर देण्यास मागेपुढे पाहणार नाही. ऑपरेशन सिंदूर ही संरक्षण क्षेत्रात 'आत्मनिर्भर भारत मिशन'ची चाचणी घेण्याची संधी होती. आता हे सिद्ध झाले आहे की आपण योग्य मार्गावर आहोत. आपले स्वदेशी उत्पादन एका निर्णायक पातळीवर पोहोचले आहे जिथे आपण आपल्या अनेक सुरक्षा आवश्यकता पूर्ण करण्यात स्वावलंबी झालो आहोत. या यशांमुळे स्वतंत्र भारताच्या संरक्षण इतिहासात एका नवीन पर्वाची सुरुवात झाली आहे.

राष्ट्रपती म्हणाल्या की, 'जागतिक अर्थव्यवस्थेतील समस्या असूनही, भारत हा गेल्या आर्थिक वर्षात ६.५ टक्के आर्थिक विकास दरासह जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि महागाई नियंत्रणात आहे आणि निर्यात वाढत आहे. भारत २०४७ पर्यंत विकसित अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे,' याचा राष्ट्रपतींनी पुनरुच्चार केला.

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) क्षेत्रात सरकार करत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक करताना राष्ट्रपतींनी सांगितले की, '२०४७ पर्यंत भारत एआय चे जागतिक केंद्र बनावे ही देशाची आकांक्षा आहे. डिजिटल युगात भारतात सर्वाधिक प्रगती माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झाली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाद्वारे दूरगामी बदल करण्यात आले आहेत आणि शिक्षणाला जीवनमूल्ये आणि कौशल्यांशी प्रयत्नपूर्वक जोडले गेले आहे. सरकार भ्रष्टाचाराविरुद्ध शून्य सहनशीलतेच्या धोरणाचे पालन करून सतत सुशासनाने पुढे जात आहे.'

'काश्मीर खोरे रेल्वेने जोडणे हे मोठे यश असून त्यामुळे या प्रदेशात व्यापार आणि पर्यटनाला चालना मिळेल आणि आर्थिक शक्यतांची दारे उघडतील,' असे राष्ट्रपती म्हणाल्या.

दिव्या देशमुखच्या यशाचे कौतुक

जागतिक बुद्धिबळ स्पर्धेसाठी 'फिडे महिला विश्वचषक'च्या अंतिम सामन्यात दोन भारतीय खेळाडू दिव्या देशमुख (विजेता) आणि कोनेरू हम्पी (उपविजेता) आमनेसामने होत्या असे सांगताना राष्ट्रपतींनी दिव्या देशमुखच्या यशाचाही गौरव केला.

'सुसंवादाचे बंध दृढ व्हावेत'

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

'सुसंवादाचे जे बंध देशाला नेहमी एकत्र ठेवतात ते आणखी दृढ करण्याची नागरिकांची जबाबदारी आजचा (१४ ऑगस्ट) फाळणी वेदना स्मृती दिन अधोरेखित करतो,' असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला केले. त्यांनी एक्सवर हे विचार व्यक्त केले.

'याच दिवशी आपल्या देशाची फाळणी झाली होती व त्यामुळे देशात मोठी उलथापालथ झाली. इतिहासातील या दुःखदायक पर्वामध्ये असंख्य नागरिकांना अतोनात वेदना सोसाव्या लागल्या. घरदार सोडावे लागले,' असे पंतप्रधानांनी नमूद केले. 'मात्र हे अकल्पित संकट कोसळूनही खचून न जाता साहसाने आयुष्याची नव्याने सुरुवात करणाऱ्यांचा सन्मान करण्याचाही हा दिवस आहे. त्या संकटग्रस्त नागरिकांतील अनेकांनी आपल्या आयुष्याची पुनर्बांधणी केली व यशाचे लक्षणीय टप्पे सर केले,' अशा शब्दांत पंतप्रधानांनी या नागरिकांचा सन्मान केला.

भारताची फाळणी झाल्यानंतर झालेल्या धार्मिक दंगलींत लाखो निरपराध नागरिक मृत्युमुखी पडले होते.

'दुःसाहसाचे गंभीर परिणाम भोगाल'

भारताचा पाकिस्तानला कठोर इशारा

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

'मोडतोड केलेले विखारी कथन पसरवणे बंद करा. कोणतेही दुःसाहस कराल, तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील,' असा कठोर इशारा भारताने गुरुवारी पाकिस्तानला दिला.

पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर यांनी अमेरिकेतून भारताला आण्विक हल्ल्याची धमकी दिली होती. त्याचबरोबर सिंधू जलवाटप करारावरून पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो यांनीही भारताला धमकी दिली होती. त्या संदर्भात परराष्ट्र मंत्रालयाने प्रतिक्रिया दिली.

'भारतविरोधात सातत्याने युद्धाची खुमखुमी व्यक्त करणारी, विखारी विधाने केली जात आहेत. अशा बातम्या आम्ही वाचल्या-पाहिल्या आहेत. स्वतःचे अपयश झाकण्यासाठी भारतविरोधी कथन पसरवण्याची ही पाकिस्तानची कार्यशैलीच आहे. आपले असत्य कथन त्यांना थांबवावे. कोणतेही दुःसाहस केल्यास त्यांना अत्यंत वेदनादायी परिणाम भोगावे लागतील, असा त्यांना शहाणपणाचा सल्ला आहे,' असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले आहे.

'भारताने सिंधू नदीवर धरण बांधण्याची वाट आम्ही पाहू. त्यांनी एकदा का धरण बांधले की ते दहा क्षेपणास्त्रांनी पाडून टाकू,' अशी धमकी असीम मुनीर यांनी अमेरिकेतून दिली होती.

Godrej Industries Limited

CIN : L24241MH1988PLC097781

Regd. Office: Godrej One, Pirojshanagar, Eastern Express Highway, Vikhroli (East), Mumbai - 400 079

Tel : 022 - 25188010 / 20 / 30 ; Fax : 022 - 25188066

website : www.godrejindustries.com ; Email Id: investor@godrejinds.com

EXTRACT OF UNAUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2025

(Amount in ₹ Crore)

Particulars	Quarter Ended			Year Ended
	30-Jun-25 Unaudited	31-Mar-25 Audited (refer note 3)	30-Jun-24 Unaudited	31-Mar-25 Audited
Total Income from Operations	4,459.80	5,779.69	4,247.93	19,657.41
Net Profit for the period before Tax and Share of Profit of Equity Accounted Investees	966.06	560.49	811.90	1,978.54
Net Profit after Tax	725.35	416.13	640.86	1,858.24
Net Profit After Tax attributable to the owners of the Company	349.22	183.08	322.49	981.38
Total Comprehensive Income for the period (Comprising Profit) for the period (after tax) & Other Comprehensive Income (after tax) attributable to the owners of the Company	365.98	145.82	316.71	995.53
Paid-up Equity Share Capital (Face value - ₹. 1 per share)	33.68	33.68	33.67	33.68
Reserves excluding Revaluation Reserve as shown in the audited Balance Sheet				10,117.86
Net worth	10,137.54	10,151.54	8,309.81	10,151.54
Debt/Equity Ratio	1.39	1.22	1.61	1.22
Debt Service Coverage Ratio	1.30	2.65	3.14	1.69
Interest Service Coverage Ratio	3.23	2.65	3.67	2.59
Earnings per share (in ₹.) (Not Annualised)				
(a) Basic	10.37	5.44	9.58	29.14
(b) Diluted	10.37	5.44	9.57	29.13

Key numbers of Unaudited Standalone Financial Results

(Amount in ₹ Crore)

Particulars	Quarter Ended			Year Ended
	30-Jun-25 Unaudited	31-Mar-25 Audited (refer note 3)	30-Jun-24 Unaudited	31-Mar-25 Audited
Turnover (Net Sales)	1,018.29	1,086.41	986.45	4,171.21
Profit / (Loss) Before Tax	(29.98)	(67.82)	105.26	190.17
Profit / (Loss) After Tax	(29.98)	(68.32)	105.26	189.67
Total Comprehensive Income for the period (Comprising Profit / (Loss) for the period (after tax) & Other Comprehensive Income (after tax)	(31.01)	(72.09)	105.13	185.53
Paid up Equity Share Capital	33.68	33.68	33.67	33.68
Reserves (excluding Revaluation Reserves)	1,588.63	1,671.47	1,655.15	1,671.47
Capital Redemption Reserve	31.46	31.46	31.46	31.46
Debenture Redemption Reserve	-	-	-	-
Securities Premium	928.29	927.51	925.14	927.51
Net worth	1,675.14	1,705.15	1,622.31	1,705.15
Outstanding Net Debt	7,640.95	7,240.94	6,334.63	7,240.94
Debt/Equity Ratio	5.78	5.30	4.71	5.30
Debt Service Coverage Ratio	0.20	0.62	0.30	0.60
Interest Service Coverage Ratio	0.97	0.77	1.77	1.40
Earning per Equity Share (EPS):-				
Basic EPS	(0.89)	(2.03)	3.13	5.63
Diluted EPS	(0.89)	(2.03)	3.13	5.63

Notes:

1) The above Statement of unaudited financial results which are published in accordance with Regulations 33 and 52 of the SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended, have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meetings held on August 13, 2025. The financial results are in accordance with the Indian Accounting Standards (Ind-AS) as prescribed under section 133 of the Companies Act, 2013 read with the relevant rules thereunder. The above results have been reviewed by the Statutory Auditors of the Company who have expressed an unmodified review conclusion vide their review reports thereon.

2) The above is an extract of the detailed format of the Quarterly Financial Results filed with Stock Exchanges under Regulations 33 and 52 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements), 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the Stock Exchanges websites i.e., National Stock Exchange of India Limited (URL: www.nseindia.com) and BSE India Limited (URL: www.bseindia.com) and on the Company's website (URL: https://www.godrejindustries.com/). The same can also be accessed by scanning the QR Code provided below.

3) The figures for the quarter ended March 31, 2025 are the balancing figures between the audited figures in respect of the full financial year and the published year to date figures upto the third quarter of the financial year.

Place: Mumbai
Date : August 13, 2025

By Order of the Board
For Godrej Industries Limited

N. B. Godrej
Chairman & Managing Director
DIN: 00066195

उत्तराखंडमध्ये धर्मस्वातंत्र्य कायदा अधिक कठोर

विधानसभेत लवकरच दुरुस्ती विधेयक

वृत्तसंस्था, देहराडून



उत्तराखंड सरकारने धर्मांतरविरोधी कायदा आणखी कठोर करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने उत्तराखंड धर्मस्वातंत्र्य (दुरुस्ती) विधेयक, २०२५च्या मसुद्यास राज्य मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. हे विधेयक विधानसभेच्या अधिवेशनात मांडण्यात येणार आहे. फसवणूक, प्रलोभन अथवा दबावाखाली करण्यात आलेल्या धर्मांतरप्रकरणी दोषी आढळणाऱ्या व्यक्तीस जास्तीत जास्त जन्मठेप व १० लाख रुपये आर्थिक दंड करण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

उत्तराखंडमध्ये २०१८मध्ये हा कायदा अंमलात आला. त्यानंतर यात करण्यात येणारी ही दुसरी दुरुस्ती आहे. प्रस्तावित कायद्यात अवैधपणे धर्मांतर करणाऱ्यांना जास्तीत जास्त १० वर्षांचा कारावास तसेच, ५० हजार रुपयांचा दंड करण्यात येत होता. परंतु या दुरुस्ती विधेयकाद्वारे या दोन्ही शिक्षा अधिक कठोर करण्यात आल्या आहेत. १९ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात हे विधेयक मांडण्यात येईल. 'राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात होत असलेले बदल लक्षात घेऊन हा कायदा अधिक कठोर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे व त्यादृष्टीने दुरुस्ती विधेयक मांडण्यात येईल,' असे भाजपचे नेते अजेंद्र अजय यांनी सांगितले. उत्तराखंडमध्ये जमीन जिहाद सुरू असल्याचा अजय यांचा दावा असून हा कायदा अधिक कठोर करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'उत्तराखंड ही देवभूमी असून या राज्याची ही मूळ ओळख जपण्यास हा कायदा मदत करेल,' असेही ते म्हणाले.

काँग्रेसची टीका

काँग्रेसने या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला आहे. 'आमचे नेते राहुल गांधी भाजपची मतचोरी उघड करत असताना लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी भाजप सरकार हे मुद्दे पुढे आणत आहे,' अशी प्रतिक्रिया प्रदेश काँग्रेस समितीचे वरिष्ठ उपाध्यक्ष सूर्यकांत धस्माना यांनी दिली.

काश्मीरचा 'दर्जा'; म्हणणे मांडा

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

जम्मू-काश्मीरचा राज्याचा दर्जा पुनर्स्थापित करण्याच्या मागणीसंबंधी याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी केंद्र सरकारला आपले म्हणणे मांडण्यास सांगितले. त्याचवेळी अलीकडेच पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यासारख्या घटनेसह तेथील वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही, अशी टिप्पणीही न्यायालयाने यावेळी केली.

शिक्षणतज्ज्ञ झहूर अहमद भट आणि सामाजिक-राजकीय कार्यकर्ते अहमद मलिक यांनी ही याचिका दाखल केली आहे. केंद्र सरकारतर्फे उपस्थित असलेले सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी ती फेटाळण्याची मागणी केली. तसेच याआधी न्यायालयाने अशा याचिकांवर दंड आकारला असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. 'जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका झाल्या आहेत. देशाच्या या भागात असलेल्या स्थितीची आपणास निश्चितच कल्पना आहे. यासंबंधी निर्णय घेताना अनेक बाबींचा विचार केला जातो,' असे मेहता म्हणाले.

दुसरीकडे, 'राज्यघटनेतील कलम ३७० रद्द करण्यासारख्या मुद्द्यांवर घटनापीठाने निकाल देऊन २१ महिने झाले आहेत. मात्र, याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. याचे एक कारण म्हणजे राज्याचा दर्जा पुनर्स्थापित करण्याचे आश्वासन देणाऱ्या केंद्र सरकारवर न्यायालयाने विश्वास ठेवला होता,' असे विधिज्ञ शंकरनारायणन यांनी सांगितले.

व्यापार चर्चेची सहावी फेरी महिनाअखेरीस

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

भारत आणि अमेरिका यांच्यातील नियोजित द्विपक्षीय व्यापार करारासंदर्भात आतापर्यंत चर्चेच्या पाच फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. या चर्चेची सहावी फेरी येत्या २५ ऑगस्ट रोजी होणे अपेक्षित आहे. यासाठी अमेरिकेचे शिष्टमंडळ भारतात येणार आहे. या शिष्टमंडळाच्या भेटीची घटिका समीप येऊ लागल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य सचिव सुनील बर्थवाल यांनी गुरुवारी दिली.

चर्चेची सहावी फेरी २५ ऑगस्ट रोजी होणार असून प्रसारमाध्यमांना वेळोवेळी माहिती दिली जाईल, असे बर्थवाल यांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयातशुल्क लागू केल्याच्या पार्श्वभूमीवर वाणिज्य सचिवांचे हे आश्वासन महत्त्वाचे ठरले आहे. अमेरिकेकडून सातत्याने कृषी व दुग्धोत्पादन या राजकीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांतील बाजारपेठांत प्रवेश मागितला जात आहे. परंतु देशातील छोट्या व मध्यम शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी भारताने अमेरिकेची ही मागणी सपशेल धुडकावून लावली आहे. असे असतानाही द्विपक्षीय व्यापार चर्चा पुढे सरकत असल्याची ग्वाही वाणिज्य सचिवांनी दिली आहे. वाटाघाटी करणारे गट, मंत्रीस्तर आणि मुत्सद्दीस्तर या तीन स्तरांवर ही चर्चा सुरू असल्याबाबत बर्थवाल यांनी लक्ष वेधले.

दर्शन पुन्हा पोलिस कोठडीत

रेणुकास्वामी हत्या प्रकरण

वृत्तसंस्था, बेंगळुरू

रेणुकास्वामी हत्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जामीन रद्द केल्यानंतर कन्नड अभिनेता दर्शनला गुरुवारी अटक करण्यात आली. या प्रकरणातील मुख्य आरोपी दर्शन याची मैत्रीण आणि अभिनेत्री पवित्रा गौडा हिला पोलिस कोठडीत दिल्यानंतर लगेचच त्याला अटक करण्यात आली.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दर्शनला बेंगळुरूमधील होसाकेरेहल्ली येथील पत्नी विजयालक्ष्मी हिच्या घरी अटक करण्यात आली. अभिनेता अटक टाळून न्यायालयात शरण जाऊ इच्छित होता, परंतु पोलिसांना त्याच्या वास्तव्याची माहिती मिळाली आणि त्याला अटक केली.

ठाणे महानगरपालिका, ठाणे

किसन नगर व लोकमान्य नगर नागरी समूह योजनेतील प्रसिद्ध केलेल्या यादीवरील सूचना/हरकतीबाबत मुदतवाढ.

महाराष्ट्र शासनाने निर्णय क्र. टीपीएस-१२१३/२०२६, दि. ०५/०७/२०१७ अन्वये, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात नागरी पुनर्निर्माण समूह विकास योजनेबाबतचे नियम मंजूर केलेले आहेत. त्यानुसार महापालिका क्षेत्रात "समूह विकास योजना" राबविण्यात येत आहे. नागरी पुनरुत्थान आराखडा (यु.आर.पी) क्र. १२ किसन नगर, हनुमान नगर, अंबिका नगर येथील यु.आर.सी. क्र. ४, ६ तसेच नागरी पुनरुत्थान आराखडा (यु.आर.पी) क्र. १३ लोकमान्य नगर मधील खुशबू अपार्टमेंट ते हरी ओम अपार्टमेंट, शास्त्री नगर, वर्तक नगर, यशोधन नगर, डवले नगर, लोकमान्य पाडा नं.२ यु.आर.सी. क्र.३ अंतर्भूत लाभार्थी/भोगवटाधारकांचे वास्तव्य व वास्तूंचे सर्वेक्षण करून सदर यु.आर.पी मधील भोगवटाधारकांची प्रारुप यादी पी आर ओ क्र. ठामपा/ पी आर ओ/ क्लस्टर/४४०/२०२५-२६ दि. १६/०७/२०२५ व ठामपा/ पी आर ओ/ क्लस्टर/४४१/२०२५-२६ दि. १६/०७/२०२५ अन्वये वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली असून सदर यादीवरील सूचना व हरकती दाखल करण्यास एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली असून, सदरची मुदत दि. १५/०९/२०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

ठामपा/पीआरओ/क्लस्टर/५३६/२०२५-२६
दि:१४.०८.२०२५
Pls visit our official web-site
www.thanecity.gov.in

सही/-
प्राधिकृत अधिकारी
क्लस्टर सेल
ठाणे महानगरपालिका,ठाणे.